**प्रेसनोट पुणे दि.०७/०४/२०१९**
**दत्तवाडी पो. स्टे.**

**"सामान्य जनते पर्यंत पोहचविली "भरोसा सेल" ची माहिती"**

सामान्य नागरिकांना अनेक छोट्या मोठ्या घरगुती अडचणी निर्माण होतात त्या अडचणी सोडवण्या करीता पोलीस विभागामध्ये नक्की कोणाकडे जायचे, कोणाला विचारायचे याबाबत योग्य माहिती नसल्याने त्या अडचणींचे उत्तर वेळेत न मिळाल्याने काही अघटीत घटना घडतात समाजातील दुर्बल अशा महिला, लहान मुले व जेष्ठ नागरिक यांच्यावर होणारे अन्याय वेळेत दुर व्हावेत याकरीता पुणे शहर पोलीस आयुक्त डॉ. के.व्यंकटेशम यांच्या संकल्पनेतुन सुरू करण्यात आलेल्या **"भरोसा सेल"**ची माहिती सामान्य नागरिकां पर्यंत पोहचविण्या करीता दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या प्रयत्नातुन या योजनेचे माहिती पत्रक दत्तवाडी पोलीस स्टेशनच्या परिसरात राहणाऱ्या गरीब कुटुंबापर्यंत पोहचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. रोज सांयकाळी गस्ती दरम्यान झोपडपट्टी परिसरामध्ये नागरिकांना भरोसा सेलची माहिती देण्यात येते.

आज रोजी शिवदर्शन येथे संघर्ष महिला मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे हे उपस्थित असताना त्यांनी जमलेल्या महिलांना, जेष्ठ नागरिकांना व लहान मुलांना पोलीस विभागाने सुरू केलेल्या **"भरोसा सेल"** ची माहिती दिली. "या सेलद्वारे दुर्बल महिलांना वैद्यकिय सेवा, त्यांचे समुपदेशन, पुनर्वसन, कौटुंबिक हिंसाचार कायद्या अंतर्गत संरक्षण, मानसोपचार तज्ञांची घेण्यात येणारी मदत या सर्व सेवा देवुन दुर्बल महिलेस तिच्यावर झालेल्या अत्याचारा विरुध्द मानसिक बळ देण्यात येते. पिडीत बालकांना मानसिक आधार व बळ देणे, बाल हक्काचे संरक्षण करणे, विधी संघर्षित बालकांना गुन्हेगारी वृत्ती पासुन परावृत्त करण्याकरीता मानसोपचार तज्ञांच्या वतीने त्यांचे समुपदेशन करणे, जेष्ठ नागरिकांना प्राधान्याने मदत पुरवुन त्यांच्या आयुष्यांची संध्याकाळ सुखकर होण्याकरीता प्रयत्न केले जातात" असे त्यांनी सांगितले. या प्रसंगी उपस्थित असणाऱ्या महिलांना **भरोसा सेल** ची माहिती पत्रकाचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी पोलीस उप निरीक्षक कुलदिप संकपाळ, श्रीकांत शिरोळे, पांडुरंग सुतार, प्रमोद भोसले, किरण रासकर व विष्णु सुतार यांनी विशेष मदत केली.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीसनिरीक्षक
दत्तवाडी पो.स्टे. पुणे शहर


करण, रोजगार निर्मान करणे व
योग्य दिशा व महिलांच्या न्याय हक्कासाठी
प्रतिष्ठाण हे हक्काचे व्यास पिठ.
* आपले नम्र *
सौ.नसिम मुजावर
कार्याध्यक्ष
सौ.संजिविनी लोणकर
सचिव
सौ.पुजा देवेंद्र
सदस्य
सौ.नसिम शेख
सदस्य
प्रिती धनावडे
सदस्य
(ट्रस्ट), संस्थापक/अध्यक्ष :- करण
हिंदु एकता आंदोलन पक्ष


महिला सक्षमी करण करणे, रोजगार बिर्माण करणे व
त्यांच्या कतृत्वाला योग्य दिशा व महिलांच्या व्याय हक्कासाठी
संघर्ष प्रतिष्ठाण हे हक्काचे व्यास पिठ.
भरोसा